# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gangsters**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **15/01/2022**

**Brief of the work done :-**

**कारंजा शहरातील २०१५ सालच्या दंगलीतील सतत फरार आरोपीस मा.श्री. @IPS_Bachchan व @SdpoKaranjalad यांच्या मार्गदर्शनाखाली @PSKaranjaCity च्या पथकाने वर्धा येथून शिताफीने अटक केली असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरु आहे .**

## दंगलीतील फरार आरोपींना वर्धा येथून अटक

### कारंजा येथिल प्रकरण

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कारंजा** ▪ शहरात १४ जुलै २०१५ ला हिंदू व मुस्लिम समाजात जातीय तनाव निर्माण झाल्याने दगडफेक व मारहान करण्यात आली होती. यावेळी पोलीसांनी जमावाला काबुत आणण्याचा प्रयत्न केला असता जमावाने पोलीसांवरही दगडफेक करून पोलीसांना जखमी केले होते. सदर घटनेबाबत तत्कालीन पोलीस निरीक्षक गजानन गुल्हाने यांनी जवळपास १०० ते सव्वाशे जणांविरूध्द विविध कलमानुसार गुन्हे दाखल करून ६३ आरोपींना ताब्यात घेतले होते. शिवाय तपासातील निष्पन्न आरोपींविरूध्द विद्यमान न्यायालयात दोषारोपपत्रही दाखल केले होते. या प्रकरणातील आरोपी इमरान खान शकील खान रा. दाईपुरा कारंजा हा आपली अटक चुकविण्याकरीत सतत फरार होता. त्यामुळे त्याचेविरूद्द कलम २९९ नुसार दोषारोपपपत्र दाखल केले. परंतु न्यायालयामार्फत वेळोवेळी पकड वॉरन्ट निघूनसुध्दा तो सतत फरार राहत होता. अशातच पोलीस नियमित शोध घेत असतांना सदर आरोपी वर्धा येथे वास्तव्यास असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्याने वर्धा येथे शोध घेतला असता आरोपी आढळून आला व त्याला ताब्यात घेउन १३ जानेवारीला कारंजा शहर पो स्टे मध्ये हजर करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी अनील ठाकरे यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार आधारसिंग सोनोने व सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव आणि सहकाऱ्यांनी ही कारवाई केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींविरूध्द पुढील कायदेशिर कारवाई करणे सुरू असल्याची माहिती ठाणेदार सोनोने यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. (ता प्र)